# ज्ञान सेतू

EDUCATIONAL DIGITAL NEWS PAPER

— शिक्षण, कौशल्य आणि करिअर याचा विश्वासाई दुवा —

संपादक – दिनेश गायके

✲ छत्रपती संभाजीनगर / पुणे ✲ वर्ष १ ✲ अंक ३५ ✲ गुरूवार दि.२७ ऑगस्ट २०२६ ✲ पाने - ४ ✲ किंमत-(अनियतकालिक खाजगी वितरण)


# शालेय विद्यार्थ्यांच्या डोळ्यांच्या आरोग्याची काळजी, मोफत चष्मे मिळणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत त्रिपक्षीय करार

**ज्ञान सेतू ब्युरो**

मुंबई – राज्यातील शालेय विद्यार्थ्यांच्या डोळ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी शासनामार्फत महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले असून शालेय शिक्षण विभाग तसेच रत्ननिधी चॅरिटेबल ट्रस्ट आणि वनसाईट एस्सिलार लक्सोटिका फाउंडेशन यांच्यामध्ये विद्यार्थ्यांच्या डोळ्यांची तपासणी करण्याबाबत सामंजस्य करार करण्यात आला. या तपासणीनंतर दृष्टीदोष आढळलेल्या गरजू विद्यार्थ्यांना नंबरचे चष्मे मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या उपस्थितीत सोमवारी सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे झालेल्या या कराराप्रसंगी शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजीत सिंह देओल यांच्यासह रत्ननिधी चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वस्त राजीव मेहता, वनसाईट एस्सिलार लक्सोटिका फाउंडेशनचे संचालक वेणू अंबाती आदी उपस्थित होते.

सामंजस्य करारानुसार राज्यातील शासकीय शाळांमधील पाचवी ते दहावीच्या २० लाख विद्यार्थ्यांच्या डोळ्यांची तपासणी करण्यासाठी विशेष प्रकल्प राबविण्यात येणार आहे. शालेय शिक्षण विभागामार्फत या प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येईल. रत्ननिधी चॅरिटेबल ट्रस्ट प्रकल्प अंमलबजावणी भागीदार म्हणून कार्य करणार असून वनसाईट एस्सिलार लक्सोटिका फाउंडेशन तांत्रिक भागीदार म्हणून कार्यरत राहील. दृष्टीदोष असलेल्या पात्र विद्यार्थ्यांना मोफत चष्मे उपलब्ध करून देण्याची जबाबदारी ही संस्था घेणार आहे.

या कराराचा कालावधी ३६ महिन्यांचा राहणार आहे. या कालावधीत राज्यभरात डोळे तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात येईल. प्रकल्पाच्या प्रगतीचे नियमित परीक्षण आणि मूल्यमापन करण्यात येणार असून त्रैमासिक प्रगती अहवालाद्वारे तपासणी शिबिरांची संख्या, लाभार्थी विद्यार्थ्यांची संख्या, चष्मा वितरण आणि अन्य बाबींचा आढावा घेतला जाणार आहे.

विद्यार्थ्यांच्या डोळ्यांच्या आरोग्य तपासणीसाठी आवश्यक माहितीचे वैज्ञानिक पद्धतीने संकलन करण्यात येणार असून विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक माहितीसंदर्भातील गोपनीयता आणि डेटा संरक्षणाच्या तरतुदींनाही करारामध्ये विशेष स्थान देण्यात आले आहे.

यापूर्वी २०१९ पासून या उपक्रमाद्वारे १८ जिल्ह्यांतील ८०० शाळांमधील सहा लाख ८० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली असून ६३ हजारांहून अधिक चष्मे पुरविण्यात आले आहेत. या उपक्रमामुळे राज्यातील लाखो विद्यार्थ्यांच्या डोळ्यांच्या आजारांचे आणि तक्रारींचे वेळेत निदान व त्यावर उपचार होण्यास मदत होणार असून गरजू विद्यार्थ्यांना मोफत चष्मे उपलब्ध झाल्याने त्यांच्या शैक्षणिक प्रगतीला चालना मिळणार आहे.

---

**विशेष लेख...**

# शासकीय रुग्णालयांना आगीचा विळखा: यंत्रणा कधी सुधरणार?

**ज्ञान सेतू ब्युरो**

**प्रा डॉ सुधीर अग्रवाल, वर्धा**

शासकीय रुग्णालयांना लागणाऱ्या आगीच्या घटना ही अत्यंत गंभीर आणि चिंतेची बाब आहे. अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयातील नवजात शिशु केअर युनिट मध्ये झालेल्या व्हेंटिलेटर स्फोटामुळे तीन निष्पाप बालकांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून ही व्यवस्था सुधारण्यासाठी तातडीने आणि ठोस पावले उचलण्याची गरज निर्माण झाली आहे.

दवाखान्यांमध्ये वारंवार लागणाऱ्या आगी आणि त्यामध्ये निष्पाप रुग्णांचे जाणारे बळी ही अत्यंत गंभीर, चिंताजनक आणि वेदनादायी बाब आहे. हॉस्पिटलमधील रुग्ण हे स्वतःचे रक्षण करण्यास असमर्थ किंवा अंथरुणाला खिळलेले असतात, त्यामुळे अशा ठिकाणी आगीच्या घटना घडणे हा मोठा गुन्हा ठरतो.

महाराष्ट्रातील शासकीय रुग्णालयांमध्ये वारंवार घडणाऱ्या आगीच्या दुर्घटना अतिशय चिंताजनक आणि दुर्दैवी आहेत. अमरावतीतील अतिदक्षता विभागात नुकत्याच लागलेल्या आगीच्या घटनेत तीन नवजात बालकांचा बळी गेला.अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालयात नवजात शिशु कक्षाला लागलेल्या आगीत तीन नवजात बालकांचा होरपळून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. सोमवारी पहाटे साडेतीन वाजता नवजात शिशू कक्षात व्हेंटिलेटरचा स्फोट होऊन ही आग लागली.

ही आग वेगाने पसरली. यानंतर रुग्णालयातील डॉक्टर्स आणि कर्मचाऱ्यांनी शिशू कक्षात असलेल्या बालकांना बाहेर काढले. ही घटना घडली तेव्हा या कक्षात ९ बालके होती. मात्र, तीन बालकांचा दुर्दैवी मृत्यू झाला. उर्वरित बालकांसह संपूर्ण नवजात शिशू कक्षातील इतर बालकांना जवळच असलेल्या सुपर स्पेशालिटी रुग्णालयात हलवण्यात आले आहे.

अमरावती जिल्हा रुग्णालयाच्या आधी राज्यात अनेक शासकीय दवाखान्यांमध्ये आग लागल्याच्या घटना घडल्या,मात्र या घटनांपासून ना सरकारने ना प्रशासनाने ना शासकीय रुग्णालयांनी काळजी घेतली .सर्व कारभार रामभरोसे सुरू आहेत. एखादी दुर्घटना घडल्यानंतर वेळी सावध व्हायला पाहिजे मात्र या संरचनेतील कुठलाच घटक सावध होत नाही. सर्व बेजबाबदारपणे वागतात.

रुग्णालयात आग लागून दुर्घटना होण्याची ही काही पहिलीच वेळ नाही. यापूर्वी अशा अनेक दुर्घटना घडल्या असून त्यात अर्भके तसेच रुग्णांचे मृत्यू झाले आहेत. मात्र, आजही परिस्थिती बदलली नाही. दुर्घटना घडते, चौकशी होते, अहवाल येतो, शिफारसी सुचवल्या जातात. त्यानंतर काय होते, कुणालाच कळत नाही. पुढे दुसरी दुर्घटना होते. अशा घटनांमधून यंत्रणा अजिबात गंभीर नसून कुणालाही जीवाचे मोल कळत नसल्याचे लक्षात येते.

(क्रमशः)

---



# जि.प. प्रा. कन्या छावणी शाळेची राज्यस्तरावर चमक

**ज्ञान सेतू ब्युरो**

छत्रपती संभाजीनगर – साईकला आविष्कार नाट्य संस्था व श्रीमती चंद्रकला किशोरीलाल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय चित्र रंगभरण स्पर्धेत✲ छावणी येथील जि.प. कन्या शाळेच्या ✲विनायक यादव (प्रथम), नोमान शेख (द्वितीय), स्वीटी जाधव व लखन श्रीवास्तव (तृतीय) यांनी यश मिळवले.

दि. २५ ऑगस्ट रोजी पारितोषिक वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी छत्रपती संभाजीनगरचे गटशिक्षणाधिकारी मा.चेतन कांबळे साहेब प्रमुख अतिथी शिक्षण विस्तार अधिकारी मा.धनराज कांबळे साहेब यांच्या हस्ते पुरस्कारार्थीचा सत्कार करण्यात आला यावेळी साहेबांनी शिक्षकांच्या कार्याचे अभिनंदन केले, पुरस्कार विजेते विद्यार्थ्यांचे कौतुक केले. विशेष म्हणजे सायंकाळी ०५:३० वाजेपर्यंत कार्यक्रम चालू असल्याचा विशेष आनंद वाटला, मान्यवरांनी कौतुक केले.

विशेष बाब अशी – राज्यस्तरीय स्पर्धेस ३० रु शुल्क असूनही उपक्रमशील शिक्षक प्रदिप मोरे यांच्या पाठपुराव्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांना स्पर्धेसाठी मोफत सहभाग मिळाला.


कार्यक्रमास शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा निलोफर शेख, छोटी बेगम, शन्नू बी, पूजा यादव, उपस्थित होते, सर्वांनी शाळेचे,विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

यावेळी मुख्याध्यापक शिवकुमार दारूवाले सर यांनी विद्यार्थ्यांना पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या,अभिनंदन केले. आण्णासाहेब खोजे सर यांनी उपस्थितांचे आभार मानले तर किरण थोरात सर,कल्पना शिंदे मॅडम, मनिषा इनामदार मॅडम यांनी यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

---


## विद्यार्थ्यांची सर्जनशीलता

सर्व विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलता आणि प्रतिभेला व्यासपीठ मिळावे या हेतूने खास उपक्रम राबविण्यात येत आहे.



तुम्ही पाठवा –

- स्वलिखित लेख
- कविता
- किंवा स्वतः काढलेले ड्रॉईंग.

कुठलाही प्रेरणादायी विषय निवडावा.

तुमची कलाकृती आमच्या अधिकृत ई-मेल आयडीवर पाठवा.

ई-मेल आयडी → dnyansetuepaper@gmail.com

मेल करताना खालील माहिती पाठवणे आवश्यक आहे.

- आपले नाव
- शाळेचे नाव
- गावाचे नाव
- आपला पासपोर्ट फोटो

★ तुमची सर्जनशीलता आम्हाला प्रेरणा देईल, इतरांनाही प्रेरित करेल! ★




## सावित्रीबाई फुले कन्या विद्यालयात विद्यार्थिनींच्या हस्ते सुंदर राख्या व भेटकार्ड निर्मिती

**ज्ञान सेतू ब्युरो**

कन्नड:- सावित्रीबाई फुले कन्या विद्यालयातील विद्यार्थिनींनी आज स्वतःच्या हाताने विविध प्रकारच्या आकर्षक राख्या व भेटकार्ड तयार केले. रंगीबेरंगी धागे, मोती, मणी व सजावटीच्या साहित्याचा वापर करून विद्यार्थिनींनी सुंदर कलाकृती साकारल्या. या उपक्रमातून विद्यार्थिनींच्या सर्जनशीलतेला, कलाकौशल्याला व स्वावलंबनाला प्रोत्साहन मिळाले. रक्षाबंधनाच्या सणामागील प्रेम, बंधुभाव व आपुलकीचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन सामाजिक कार्यकर्ते रवी भाऊ राठोड व नगरसेवक संतोष निकम यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापिका आदरणीय दळवी मॅडम, संजय जाधव सर, प्राध्यापक भोसले सर, विसपुते सर यांची उपस्थित होती विद्यार्थिनींच्या सुंदर कलाकृतींचे मान्यवरांनी कौतुक केले. यावेळी विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी मेहनत घेतली.

## 'किलबिल'





**विराज रामेश्वर काळे**
संस्कार बालक मंदिर, मयूर पार्क, हर्सूल परिसर, छत्रपती संभाजीनगर

# क्लासेस चालकांसमोरील आव्हाने आणि न्याय्य नियमांची मागणी

**ज्ञान सेतू ब्युरो**

छत्रपती संभाजीनगर : महाराष्ट्र शासनाने प्रस्तावित केलेल्या Private Coaching Centers (Registration and Regulation) Act, 2026 च्या प्रारूपामुळे राज्यातील कोचिंग क्लासेस क्षेत्रात मोठे बदल होण्याची शक्यता आहे. या प्रारूपातील तरतुदींचा सोप्या भाषेत आढावा ॲड. शोमितकुमार व्हि. साळुंके, विधीज्ञ, उच्च न्यायालय खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर यांनी मांडला आहे.

प्रस्तावित नियमांनुसार १३ वर्षांखालील विद्यार्थ्यांना कोचिंग क्लासमध्ये प्रवेश, तळघरात क्लासेस चालविणे तसेच शाळा-कॉलेज आणि कोचिंग क्लासेसमधील टायअप किंवा Integrated Coaching मॉडेलवर निर्बंध येऊ शकतात. २५ पेक्षा अधिक विद्यार्थी असलेल्या क्लासेसना नोंदणी करणे, प्रत्येक विद्यार्थ्याला किमान २ चौ.मी. जागा उपलब्ध करून देणे, सीसीटीव्ही व अग्निसुरक्षा प्रमाणपत्र घेणे आणि विद्यार्थ्याने क्लास सोडल्यास १० दिवसांत फी परत करणे अशा तरतुदी प्रस्तावित आहेत.

नियमभंगासाठी ₹१ लाख ते ₹५० लाखांपर्यंत दंडाची तरतूद असल्याने लहान व मध्यम क्लासेसवर आर्थिक दबाव येण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. तसेच दिशाभूल करणाऱ्या जाहिराती, खोटे निकाल किंवा Rank याबाबतही कठोर कारवाई होऊ शकते. मान्यताप्राप्त शाळा-कॉलेजमधील शिक्षकांना खासगी कोचिंगमध्ये शिकविण्यावर प्रस्तावित निर्बंधाचाही क्लासेस क्षेत्रावर परिणाम होण्याची शक्यता आहे.

क्लासेस चालकांसाठी काही सकारात्मक बाजू

प्रस्तावित नियमामुळे अनधिकृत क्लासेसवर नियंत्रण येऊन नियमांचे पालन करणाऱ्या संस्थांना विश्वासार्हता मिळू शकते. CCTV, अग्निसुरक्षा आणि विद्यार्थ्यांना पुरेशी जागा यामुळे विद्यार्थ्यांची सुरक्षितता वाढण्यास मदत होईल. दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींवर नियंत्रण आल्यास गुणवत्तेच्या आधारावर स्पर्धेला चालना मिळू शकते.

प्रमुख अडचणी कोणत्या?



१३ वर्षांची सरसकट वयोमर्यादा हा सर्वाधिक परिणाम करणारा मुद्दा ठरू शकतो. विशेषतः इयत्ता ५ वी ते ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी चालणारे Foundation, Scholarship आणि Academic Classes यावर त्याचा परिणाम होऊ शकतो. त्याचबरोबर मोठ्या दंडाची तरतूद, प्रति विद्यार्थी जागेचे निकष, सीसीटीव्ही व Fire Safety चा खर्च, फी परताव्याची तरतूद आणि School-College Tie-up वरील निर्बंध यामुळे क्लासेसच्या खर्च व उत्पन्नाच्या समीकरणावर परिणाम होण्याची शक्यता आहे.

उच्च न्यायालयात याचिकेची शक्यता

ॲड. साळुंके यांच्या मते, सध्या हे कायद्याचे प्रारूप असल्याने तत्काळ 'कायदा रद्द करा' अशी याचिका करण्यापेक्षा शासनाने मागविलेल्या हरकती व सूचना प्रथम दाखल करणे अधिक योग्य ठरू शकते. कायदा मंजूर झाल्यानंतर किंवा त्यावर आधारित प्रत्यक्ष कारवाई झाल्यास संविधानाच्या Article 226 अंतर्गत उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्याचा मार्ग उपलब्ध होऊ शकतो.

अशा याचिकेत Article 14 आणि Article 19(1)(g) अंतर्गत समानता व व्यवसाय करण्याच्या अधिकाराचा मुद्दा उपस्थित करता येऊ शकतो. निर्बंध हे वाजवी, आवश्यक आणि प्रमाणबद्ध आहेत का, १३ वर्षांची सरसकट बंदी आवश्यक आहे का, तसेच ₹१ ते ₹५० लाखांचा दंड उल्लंघनाच्या स्वरूपाच्या तुलनेत प्रमाणबद्ध आहे का, असे प्रश्न उपस्थित होऊ शकतात.

Registration suspend किंवा cancel करण्यापूर्वी नोटीस, सुनावणी, कारणयुक्त आदेश आणि प्रभावी अपीलची संधी मिळावी, हा Natural Justice चा मुद्दाही महत्त्वाचा ठरू शकतो. तसेच केवळ FIR दाखल झाली म्हणून एखाद्या व्यक्तीला कोचिंगमध्ये काम करण्यास बंदी घालणे योग्य आहे का, याचाही घटनात्मक कसोटीवर विचार होऊ शकतो.

सरकारकडे कोणत्या मागण्या करता येतील?

क्लासेस क्षेत्राने केवळ विरोध न करता 'न्याय्य व व्यवहार्य नियमन' अशी भूमिका घेणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले आहे. १३ वर्षांची सरसकट वयोमर्यादा पुनर्विचारात घ्यावी, इयत्ता ५ वी ते ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र नियम असावेत, दंडासाठी Gradual Penalty System असावी, लहान क्लासेससाठी स्वतंत्र Compliance Category असावी आणि नोंदणी प्रक्रिया ऑनलाइन व सोपी असावी, अशा मागण्या करता येऊ शकतात.

तसेच CCTV Fire Safety व साठी संक्रमण कालावधी, विद्यार्थ्याने किती दिवस वर्ग केला याचा विचार करून न्याय्य Fee Refund व्यवस्था आणि नियम तयार करण्यापूर्वी क्लासेस चालक, पालक, विद्यार्थी, शिक्षक व शिक्षणतज्ज्ञ यांच्याशी चर्चा करण्याची मागणीही करता येऊ शकते.

विशेषतः ४ सप्टेंबर २०२६ पूर्वी शासनाकडे सविस्तर हरकती व सूचना दाखल करणे महत्त्वाचे ठरू शकते. प्रत्येक प्रस्तावित तरतुदीचा क्लासेसवर होणारा परिणाम, घटनात्मक आक्षेप आणि त्याला पर्यायी व्यवहार्य तरतूद अशा पद्धतीने मांडणी केल्यास पुढील कायदेशीर प्रक्रियेसाठीही त्याचा उपयोग होऊ शकतो.

**– ॲड. शोमितकुमार व्हि. साळुंके**
विधीज्ञ, उच्च न्यायालय खंडपीठ,
छत्रपती संभाजीनगर

****

डॉ.संतोष गालफाडे
मो. 9764716974

## ध्येयाचा वेध....



## 'का?' विचारणारा विद्यार्थी घडवा.

**ज्ञान सेतू ब्युरो**

लहान मुलांच्या मनात असंख्य प्रश्न असतात. 'आकाश निळे का दिसते?', 'पाऊस कसा पडतो?', 'असे का होते?' अशा प्रश्नांनी त्यांचे कुतूहल व्यक्त होत असते. पण जसजसे शिक्षण पुढे जाते तसतसे अनेक विद्यार्थी प्रश्न विचारण्यापेक्षा उत्तरे पाठ करण्याला अधिक महत्त्व देऊ लागतात. ही प्रवृत्ती बदलण्याची गरज आहे.

शिक्षणाचा उद्देश केवळ योग्य उत्तर लिहिणे नसून योग्य प्रश्न विचारण्याची क्षमता विकसित करणे हा देखील आहे.

एखादा ऐतिहासिक प्रसंग झाला, तर 'तो कधी झाला?' एवढेच न विचारता 'तो का झाला?', 'त्याचे परिणाम काय झाले?' असा विचार करा. विज्ञानातील एखादा नियम शिकताना तो पाठ करण्याऐवजी 'हा नियम का लागू होतो?' असा प्रश्न विचारा. साहित्य वाचताना 'लेखकाने हे असे का लिहिले?' याचा विचार करा.

'का?' हा छोटासा प्रश्न विद्यार्थ्याला पाठांतरापासून विचाराकडे घेऊन जातो.

प्रश्न विचारण्याची सवय केवळ वर्गापुरती मर्यादित नसावी. वर्तमानपत्रातील बातमी वाचताना, सोशल मीडियावरील माहिती पाहताना किंवा एखाद्याचे मत ऐकताना 'हे खरंच आहे का?', 'यामागे पुरावा काय आहे?' असे प्रश्न मनात निर्माण झाले पाहिजेत. यामुळे चिकित्सक विचार करण्याची क्षमता विकसित होते.

प्रश्न विचारणारा विद्यार्थी प्रत्येक माहिती तशीच स्वीकारत नाही. तो तपासतो, तुलना करतो, विचार करतो आणि मग निष्कर्ष काढतो.

पालक आणि शिक्षकांनीही विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना प्रोत्साहन दिले पाहिजे. काही प्रश्न साधे असतील, काही विचित्र वाटतील; पण प्रत्येक प्रश्नामागे शिकण्याची संधी दडलेली असते.

ज्या विद्यार्थ्यांच्या मनातील कुतूहल जिवंत असते, त्याचे शिक्षण कधीच संपत नाही.

म्हणून उत्तरांच्या मागे धावताना प्रश्न विचारायला विसरू नका. कारण अनेक मोठ्या शोधांची सुरुवात एका साध्या 'का?' पासूनच झालेली आहे.

## चालू घडामोडी

27 ऑगस्ट 2026 गुरुवार

**आंतरराष्ट्रीय**
- ब्रिक्स शिखर परिषद 2026 'जोहान्सबर्ग, दक्षिण आफ्रिका' येथे संपन्न.
- भारत आणि युरोपियन युनियन यांच्यात मुक्त व्यापार करार (FTA) वर अंतिम सहमती.
- जपानने 'हायपरलोच सॅट-2' उपग्रह यशस्वीरित्या प्रक्षेपित केला.
- संयुक्त राष्ट्रसंघाने 'क्लायमेट फायनान्स फोरम 2026' आयोजित केले.

**राष्ट्रीय**
- भारत सरकारने 'राष्ट्रीय हरित हायड्रोजन धोरण 2026' जाहीर केले.
- इस्रोने 'चंद्रयान-4' मोहिमेसाठी प्रक्षेपण तारीख जाहीर केली – नोव्हेंबर 2026.
- नवी दिल्ली येथे 'भारत मोबिलिटी ग्लोबल एक्सपो 2026' आयोजित.
- भारताचा सर्वात उंच रेल्वे पूल 'चिनाब ब्रिज' अधिकृतपणे सुरू.

**राजकारण**
- लोकसभा पावसाळी अधिवेशन 2026 यशस्वीपणे पार पडले.
- जीएसटी 2.0 रचना 22 सप्टेंबर 2026 पासून लागू होणार.
- निवडणूक आयोगाने बिहार विधानसभा निवडणुकीची तारीख जाहीर केली.

**अर्थव्यवस्था**
- भारताची GDP वाढ दर 2026-27 साठी 6.8% असल्याचा अंदाज.
- रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने रेपो दरात कोणताही बदल नाही – 6.25% कायम.
- सेबीने इन्व्हेस्टर्ससाठी 'स्मार्ट इन्व्हेस्टमेंट प्लॅटफॉर्म' सुरू केला.
- देशाचा परकीय चलन साठा 700 अब्ज डॉलर्सच्या पुढे.

**संरक्षण**
- भारतीय नौदलाने 'समुद्र शक्ती-2026' सराव यशस्वीरित्या पूर्ण केला.
- DRDO ने 'अस्त्र Mk-2' क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी घेतली.
- भारत आणि फ्रान्स यांच्यात संरक्षण सहकार्य वाढविण्यासाठी करार.

**विज्ञान व तंत्रज्ञान**
- भारताने पहिला 'क्वांटम कम्युनिकेशन सॅटेलाइट' यशस्वीरित्या कक्षेत स्थापित केला.
- आयआयटी मुंबईने पाणी शुद्धीकरणासाठी नवे नॅनो-तंत्रज्ञान विकसित केले.
- गूगलने 'जेलिनी 2.0 प्रो' AI मॉडेल लॉंच केले.

**क्रीडा**
- आशिया कप 2026 – भारताने श्रीलंकेचा पराभव करून फायनलमध्ये प्रवेश केला.
- नीरज चोप्राने लॉझान डायमंड लीग 2026 मध्ये प्रथम क्रमांक पटकावला.
- भारताने जुनियर हॉकी विश्वचषक 2026 जिंकला.

**पुरस्कार व सन्मान**
- नोबेल शांती पुरस्कार 2026 – ऑक्सफॅम इंटरनॅशनल यांना प्रदान.
- ज्ञानपीठ पुरस्कार 2026 – ज्येष्ठ साहित्यिक मदन कौल यांना जाहीर.
- पद्म पुरस्कार 2026 – 7 पद्म विभूषण, 19 पद्म भूषण, 113 पद्म श्री जाहीर.

**महत्वाच्या दिवस** ★ राष्ट्रीय क्रीडा दिवस (मेजर ध्यानचंद जयंती) ★ आंतरराष्ट्रीय पर्यटन दिवस ★ जागतिक NGO दिवस

"आजची तयारी, उद्याचे यश!"

## दिनविशेष

**27 ऑगस्ट 2026 – गुरुवार**

**भारतीय दिनविशेष**

**• राष्ट्रीय अंतराळ दिवस**
27 ऑगस्ट हा भारतात 'राष्ट्रीय अंतराळ दिवस' म्हणून साजरा केला जातो.
27 ऑगस्ट 1979 रोजी भारतीय उपग्रह 'भास्कर-2' यशस्वीपणे अंतराळात प्रक्षेपित करण्यात आला.

**• लाला लाजपत राय जयंती**
27 ऑगस्ट 1865 रोजी महान स्वातंत्र्यसैनिक, समाजसुधारक आणि 'पंजाब केसरी' म्हणून ओळखले जाणारे लाला लाजपत राय यांचा जन्म झाला.

**• नानाजी देशमुख जयंती**
27 ऑगस्ट 1916 रोजी नानाजी देशमुख यांचा जन्म झाला.
ते समाजसेवक, विचारवंत आणि ग्रामीण विकासाचे महान प्रेरणास्थान होते.

**• महत्वपूर्ण घटना**
- 1647 – छत्रपती शिवाजी महाराजांनी जंजिऱ्याविरुद्ध मोहीम केली.
- 1859 – भारतात पहिले पोस्टल मनी ऑर्डर सेवा सुरू झाली.
- 1908 – क्रांतिकारक खुदीराम बोस यांना फाशी (11 ऑगस्ट रोजी शिक्षा, 27 ऑगस्ट रोजी अंमल).
- 1947 – सिक्कीमने भारताशी विलिनीकरण करार केला.

**• महत्वपूर्ण पुण्यतिथी**
- पं. मदन मोहन मालवीय – 12 नोव्हेंबर 1946 (शिक्षणतज्ज्ञ आणि स्वातंत्र्यसैनिक)
- बाळ गंगाधर टिळक – 1 ऑगस्ट 1920 (लोकमान्य टिळक)

**• इतर महत्वाच्या घटना**
- 27 ऑगस्ट 2003 – जगातील सर्वात मोठे दुर्बिणींपैकी एक 'ग्रॅन टेलिस्कोपी कॅनरी आयलंड्स' कार्यरत.
- 27 ऑगस्ट 2014 – भारताने अंतराळात मंगळ मोहीम 'मंगळयान' यशस्वीरित्या प्रक्षेपित केली.

**आजचा सुविचार**
"स्वप्ने ती नसतात जी आपण झोपेत पाहतो,
स्वने ती असतात जी आपल्याला झोपू देत नाहीत."

## ॥ अध्यात्म ॥

मधुकर बोरीकर,
पुणे

### ◆ श्री लक्ष्मी व नरसिंह मंदिर निरा नरसिंगपूर



पुढे.....
मंदिराचे शिखरावर 176 शिल्पे कोरली आहेत. गर्भ गृहाचा दरवाजा पितळी आहे. गाभाऱ्याच्या ललाट बिंदूवर श्री गणेशाची प्रतिमा आहे. मंदिराच्या भिंतीवर मारुती राय शेषशाही विष्णू यांच्या शुभ प्रतिमा कोरलेल्या आहेत. मंदिराचे शिखर 70 फूट उंच आहे.

◆ मंदिरातील विशाल घंटा
ही घंटा वसई येथे पोर्तुगीज लोकांच्या चर्च साठी बनवली होती. वसई विजयात ती मराठ्यांच्या ताब्यात आली. आणि तिथे प्रतिष्ठित करण्यात आली.

◆ नरसिंह भगवंताचा विग्रह
भक्त प्रल्हादाने पुजलेली ही मूर्ती दोन्ही हात मांडीवर ठेवून विरासन मुद्रेत असून, समोरच्या मंदिरातील भक्त प्रल्हाद यांच्या मूर्तीकडे, व भक्तांकडे भगवान नृसिंह अत्यंत करुणेने पहात असल्याचे दिसते. या मूर्तीच्या डाव्या बाजूला असलेल्या गर्भगृहात भगवान ब्रह्मदेवांनी पुजलेली, अत्यंत प्राचीन अशी श्री नरसिंह शाम राजाची (शांत भाव असलेली असल्यामुळे हिला शाम राज असे म्हणतात.) उत्तराभिमुख मूर्ती आहे. हे देवस्थान अत्यंत जागृत आहे. (क्रमशः)

## ॥ संजय उवाच... ॥



@संजय काव्या पुणे 7743918559

**रोज कोणतेही एक तरी काम असे करावे ज्यामध्ये आपला काहीचं स्वार्थ नसावा. हे खूप पुण्याचे काम असेल. यातील फायदा न दिसणारा असतो पण तो तुम्हाला भविष्यात भरपूर काही देऊन जाईल.**

(हे माझे मत आहे पटले तर घ्यावे)




## संत कबीर के दोहे

मूळ हिंदी चौपाई व मराठी अर्थ

**साखी ३०**
*सुनिये सन्तों साधु मिलि, कहहिं कबीर बुझाय।*
*जेहि विधि गुरु सों प्रीति हो, कीजै सोई उपाय ॥*

**मराठी अर्थ :**
*कबीरदास म्हणतात की, संतांचा सहवास करा आणि त्यांचे मार्गदर्शन ऐका. गुरूवर प्रेम, श्रद्धा आणि निष्ठा वाढेल असा जो कोणताही मार्ग असेल, तो अवश्य स्वीकारावा. हाच आध्यात्मिक प्रगतीचा खरा उपाय आहे.*



संकलन :
उदय भास्कर खांडेकर, मो. 9421908190

# प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांना अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघाचा उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार प्रदान

**ज्ञान सेतू ब्युरो**

फुलंब्री दिनांक २६ ऑगस्ट २०२६ रोजी अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर जिल्हा आयोजित गुरुवंदन सोहळा व शिक्षा सन्मान पुरस्कार-२०२६ आयोजन विवेकानंद महाविद्यालय समर्थनगर, छत्रपती संभाजीनगर येथे करण्यात आले होते. या सोहळ्यासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून माजी प्राचार्य व जेष्ठ शिक्षण तज्ज्ञ् प्राचार्य डॉ. सर्जेराव ठोंबरे यांची उपस्थिती लाभली. तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्र-कुलगुरू, प्रोफेसर, डॉ. प्रवीण वक्ते व छत्रपती संभाजीनगर विभागाच्या उच्च शिक्षण सहसंचालक, प्रोफेसर, डॉ. पंकजा वाघमारे यांची तर अध्यक्षस्थानी अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघाचे प्रदेश



महासचिव प्रोफेसर, डॉ दिलीप अर्जुन उपस्थित होते.

या गुरुवंदन सोहळ्यानिमित्त जिल्हा परिघातील शैक्षणिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थाचालक, प्राचार्य व प्राध्यापक यांना शिक्षा सन्मान पुरस्कार-२०२६ हा प्राचार्य श्रेणीतील पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले यांना देऊन गौरविण्यात आले. हा पुरस्कार शिस्तप्रिय नेतृत्वाला, कर्तव्यनिष्ठ कार्याला, दूरदृष्टीला आणि शैक्षणिक क्षेत्रातील भरीव योगदानाला मिळालेली ही गौरवाची पावती आहे.

यात प्राचार्य श्रेणीतील-६ प्राध्यापक श्रेणीतील-१० आणि संस्थाचालक श्रेणीतील-६ असे पुरस्कार प्रदान करण्यात आले. या गुरुवंदन सोहळ्यासाठी जिल्हा परिघातील शैक्षणिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थाचालक, प्राचार्य व प्राध्यापक यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. संदीप जगताप यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील प्रोफेसर, डॉ. पांडुरंग कल्याणकर, प्रोफेसर, डॉ. विजय पांडे, प्रोफ ेसर, डॉ. संजीवकुमार पांचाळ, प्रा. डॉ. महेश थोरात, प्रा. डॉ. नितीन माळेगावकर, श्री बाबासाहेब दाभाडे यांची उपस्थिती होती.

## जामिया उमर बिन खत्ताब शैक्षणिक संकुलामध्ये प्रख्यात मोटिव्हेशनल स्पीकर श्री मुनव्वर जमा यांचे हृदयस्पर्शी मार्गदर्शन




**ज्ञान सेतू ब्युरो**

कन्नड - जामिया उमर बिन खत्ताब कुंजखेडा शैक्षणिक संकुलामध्ये मंगळवार दिनांक २५ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध मोटिव्हेशनल स्पीकर श्री मुनव्वर जमा यांचे विद्यार्थांसाठी हृदयस्पर्शी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्यात मुनव्वर जमा यांनी आजच्या आधुनिक युगात विद्यार्थ्यांच्या असंस्कारकडे तसेच समाज माध्यमाच्या गैरवापरामुळे व व्यसनाच्या आहारी वाढत चाललेली विद्यार्थ्यांची सवय यावर पालकांनी मुलांच्या प्रत्येक सवयीवर व त्यांच्या मानसिकतेवर लक्ष केंद्रित केले पाहिजे व विद्यार्थ्यांनीही आई-वडिलांच्या परिस्थितीनुरूप आपले जीवन जगले पाहिजे. असे संस्कार विद्यार्थी व मुलांमध्ये रुजले तर त्यांच्या जीवनाचा प्रवास केव्हाही सुखकर होईल व जीवनात केव्हाही अडथळा निर्माण होणार नाही व एक चांगला समाज निर्माण होईल देशात सुख समृद्धी व शांती नांदेल या सर्व गोष्टी फक्त शिक्षण घेण्यानेच नव्हे तर शिक्षणाबरोबर चांगले आचरण सुद्धा आपल्या अंगी बाळगणे गरजेचे आहे.

''सुसंस्काराची साथ असे जीवन होते धन्य
सत्य प्रेम अन सदाचाराने माणूस होतो मान्य ''असे प्रतिपादन केले तसेच उप विभागीय पोलीस अधिकारी आरती आर पवार मॅडम यांनी मुलींच्या सुरक्षिततेबाबत पोलीस प्रशासन सर्वतोपरी सक्षम आणि तत्पर असते तसेच यामध्ये समाजाची साथ मिळणे सुद्धा तितकेच गरजेचे आहे जेणेकरून समाजामध्ये मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्नच निर्माण होणार नाही व एक सुसंस्कारिक समाज निर्माण होईल असे प्रतिपादन केले कार्यक्रमाचे आयोजन संस्था अध्यक्ष मौलाना फारुख वस्तानवी यांनी केले याप्रसंगी शैक्षणिक संकुला मधील सर्व मुले मुली मिळून ३५०० विद्यार्थी उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून मुनव्वर जमा तसेच कारी असरार साहब , इशतीयाक साहब ,तंजिल अहमद , खुबेब साहब ,मौलाना बिनामीन ,संस्थेचे सर्व युनिटचे प्राचार्य परिसरातील पालक वर्ग हजर होते संस्था प्रतिनिधी शरीफ बेग सर यांनी संस्थेची थोडक्यात माहिती दिली कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मौलाना नूर अली यांनी केले व मौलाना फारुख वस्तानवी यांच्या हस्ते दुवा ने कार्य क्रमाची सांगता झाली

## धाराशिव उपपरिसरात स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्र; दहा महाविद्यालयांचे क्लस्टर तयार करून स्टार्टअपला चालना

**ज्ञान सेतू ब्युरो**

धाराशिव - डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या धाराशिव उपपरिसराच्या विकासाला नवी दिशा देण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. उपपरिसरात विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्र उभारण्यात येणार असून, विद्यार्थ्यांमधील नवउद्योजकतेला चालना देण्यासाठी दहा महाविद्यालयांचे क्लस्टर तयार करण्यात येणार आहे.

ही माहिती विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. डॉ. प्रवीण वक्ते यांनी दिली.

विद्यार्थ्यांना मिळणार स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन

धाराशिव उपपरिसरातील विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन, अभ्यासाचे वातावरण आणि सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याचे विद्यापीठाचे नियोजन आहे. यामुळे ग्रामीण व निमशहरी भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी अधिक चांगल्या संधी उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे.

दहा महाविद्यालयांचे क्लस्टर

विद्यार्थ्यांच्या नव्या कल्पनांना व्यासपीठ मिळावे आणि त्यातून रोजगारनिर्मितीला चालना मिळावी, यासाठी परिसरातील दहा महाविद्यालयांचे एकत्रित क्लस्टर तयार करण्यात येणार आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या नाविन्यपूर्ण संकल्पना, उद्योजकता आणि स्टार्टअप्सना प्रोत्साहन देण्याचे नियोजन आहे.

उपपरिसराच्या विकासाला नवी दिशा

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत धाराशिव उपपरिसराच्या विकासासंदर्भात हे महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. त्यानुसार स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्र आणि महाविद्यालयीन क्लस्टरच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच करिअर, स्पर्धा परीक्षा आणि उद्योजकतेच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने पुढील नियोजन सुरू आहे.

या उपक्रमांमुळे धाराशिव उपपरिसर हा विद्यार्थ्यांच्या स्पर्धा परीक्षा तयारी आणि स्टार्टअप संस्कृतीचे केंद्र म्हणून विकसित होण्यास मदत होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## लातूर जिल्ह्यात आयटीआय प्रवेशाची ८५.६८ टक्के जागा भरल्या; रिक्त ५७९ जागांसाठी स्पॉट काऊन्सेलिंग सुरू

**ज्ञान सेतू ब्युरो**



लातूर : जिल्ह्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये (आयटीआय) प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची बातमी आहे. जिल्ह्यातील २२ आयटीआय संस्थांमध्ये उपलब्ध असलेल्या ४,०४४ जागांपैकी ३,४६५ जागांवर प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाली असून ५७९ जागा अद्याप रिक्त आहेत. या रिक्त जागा भरण्यासाठी विशेष संस्थास्तरीय समुपदेशनाची फेरी सुरू करण्यात आली आहे.

या विशेष फेरीत प्रवेश घेण्याची अंतिम तारीख २९ ऑगस्ट २०२६ आहे. त्यामुळे आयटीआय मध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही प्रवेशाची शेवटची संधी मानली जात आहे.

नोंदणी न केलेल्या विद्यार्थ्यांनाही संधी

विशेष म्हणजे, यापूर्वी आयटीआय प्रवेश प्रक्रियेसाठी कोणत्याही प्रकारचे रजिस्ट्रेशन केले नसलेल्या विद्यार्थ्यांनाही या विशेष संस्थास्तरीय समुपदेशन फेरीत सहभागी होण्याची संधी देण्यात आली आहे. संबंधित विद्यार्थ्यांना नवीन नोंदणी करून उपलब्ध जागांवर प्रवेश घेता येणार आहे. त्यामुळे इच्छुक विद्यार्थ्यांनी वेळ न दवडता संबंधित आयटीआय संस्थेशी संपर्क साधून रिक्त जागा, उपलब्ध ट्रेड आणि प्रवेशाची प्रक्रिया याबाबत माहिती घ्यावी. अंतिम तारीख : २९ ऑगस्ट २०२६ आयटीआय मध्ये तांत्रिक व कौशल्याधारित शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.













# मायेच्या हरवलेल्या त्या सावल्या....

**ज्योतिर्मय साहित्य**

मध्यान्हीच्या त्या प्रहाराला सहज म्हणून बाहेर पडले होते. हवेतला तो गारवा अंगाला शिरशिरी आणत होता. हरवलेला मामाचा गाव आजचा विषय, काय बरे लिहावे! विचारांच्या तंद्रीत चालत असताना नुकतीच कोसळून गेलेली ती सर आणि शेजारच्या शेतातल्या पिकांच्या पानांवर पडलेलं ते सोनेरी ऊन त्यावरून उडत जाणारे ते करड्या रंगाचे ते पाखरू भुर्रकन उडून जात होते. आणि हलणारी ती पाने कवी मनाला भुरळ घालत होती.

आपोआप तोंडून आले. वाहवा! किती सुंदर हा नजारा अहाहा!

पळणाऱ्या त्या ढगाला
कोणी धक्का जणू दिला,
रडू.. रडू.. मायच्या मायेपोटी
जणू धरेवारी काकुळतीला आला.

आणि एवढ्यात वाऱ्याची मंद झुळूक आली नि दवांची त्या बरसात ओली आणि आठवण झाली ती तेव्हांची..

कृष्णेच्या काठाची मंद झुळूक आली,
त्या मंद झुळुकेने काढली माझी खोडी.
आजही आठवते ती वाट नागमोडी
माडांच्या दाटीतून पळते झुक झुक् गाडी.
गावंधरीच्या ओढ्यात सु बाभाळ एक वेडी
चिंचेच्या झाडावर घुमते भालघुरामची जोडी.

...भर दुपारच्या त्या उन्हाच्या काहिलीतून खळखळ आवाज करत मातीच्या त्या पाटातून जाणारे तेंव्हाचे ते पाणी आजही आठवते. एस टी तून उतरून नांदगावच्या त्या पुलावरून मामाच्या घरी जाताना भेटलेला तो मामा कोण होता नाही माहीत, मध्यान्ही च्या उन्हाची ती परिभाषा त्या ऊन सावल्या निहाळताना ‘‘कशी आहेस ग आक्का‘‘ एक आक्का सगळ्या गावची आक्का होती. उन्हाच्या काहिलीतून सावलीचे ते दोन निवांत क्षण अनुभवताना खऱ्या शीतलाईची जाणीव आजही होते. असे ते दोन प्रेमाचे शब्द आज तो मामा कुठे कसा असेल माहित नाही पण वळण वेड्या वाटेने धावताना अशी किती नाती आयुष्यात येतात हो ना!

कृष्णामाईच्या पुलावरून जाताना नदीच्या त्या पाण्यात टाकलेले ते नाणे आज..? खरंच तिथेच असेल



का!की.., काळाच्या प्रवाहात ते कुठे असेल? गावंधरीच्या ओढ्यात असलेली ती एकटीच सु बाभळ आणि तिची पडलेली ती वाळकी सावली, तिच्या शेंड्यात आलेली हिरवीगार कोवळी पाने कधी केंव्हा नष्ट झाली हे कधी कळलेच नाही. तिच्या शेजारी असणारी चिंच तिच्या मातीतून वर आलेल्या मुळ्या नेहमी मला प्रश्नात पडायच्या. तिच्या खाली असलेला तो छोटा ओढा त्या उंच उतारावर अन् त्या ओढ्यात पडलेला तो चिंचेच्या झाडाचा छोट्या छोट्या पिवळसर पानांचा सडा काही झाडाच्या बुंध्यापाशी असायचा नि काही त्या पाण्याच्या प्रवाहाबरोबर वाहून पुढच्या रस्त्याला लागलेला दिसायचा.अन् आवाज यायचा तो म्हणजे त्या भालघुरामचा अन् त्याला पाहण्याची ती उत्सुकता शिगेला पोहचायची,आणि तो दिसल्यानंतर आज काहीतरी छान गोड खायला मिळणार म्हणून मनाला खूप आनंद व्हायचा. आणि मग तंद्री मोडायची ती त्या खळाळणाऱ्या त्या छोट्या ओढ्यातील पाण्याने

अशाच त्या प्रवाहाबरोबर चिंचेच्या झाडावर येणाऱ्या भारद्वाज ही नकळत केंव्हा उडून गेला ते कळले नाही.



©सौ. वैशाली महाडिक, सातारा ९७६७४३७९२३

अंकुरेल बहरेल जाई जुई वेलीवरी
दूर उडाली पाखरे येतील मागल्या दारी,
अजब रीत संसारी त्याला संसाराची गोडी.
किलकिल्या डोळ्यात वाट पाहते माया ती वेडी.

काळाच्या प्रवाहात आजोबा ,आजी, मामी आणि.. नाहीशी झालेल्या त्या अंगणातल्या सावल्या अशाच एक दिवस नकळत दिसायच्या बंद झाल्या. त्या वाहत्या प्रवाहाप्रमाणे काळ किती बदलतो ना! म्हणजे समय चक्र आहे मान्य आहे.परिवर्तन ही काळाची गरज आहे. आज मावळलेला सूर्याला उद्या पुन्हा यायचे आहे. पण तरीही एखादे वलय चक्र फिरावे तसे ते आकाशातील ढग सरकत सरकत गेले. नि दूर पांगणाऱ्या त्या वाटाना त्यांचे त्यांचे वेद लागले. जवळ असूनही दोन झाडांमधले अंतर अगदी औपचारिक दृष्ट्या किंवा मोज पट्टीत मुजत गेले.

मायची माया (मामा) मायेचे मीलन (मामी)
दारी उगवले उंबराचे फुल
प्रेमाचं ग लडिवाळ बोलणं. खिरपुरी,
पोळी शिकरण, गुळ साखरेची गोडी,
भाचरांच्या मजाकला टित लावते खोडी.
कृष्णेच्या काठची मंद झुळूक आली.
आठवणीत हरवली ती थोडी थोडी.

तो काळा तीट आज औपचारिकतेत बदलला. मागल् दाराला असणाऱ्या त्या दगडी पायऱ्या, कोनाड्यात असलेल्या त्या कपाटात असणाऱ्या वेफर्स चा तो डबा, येता जाता वाटेत येणारे व्हनं, चौकटीतून आत शिरताना उजव्या हाताला असलेले जाते त्याच्या बाहेर असणारी ती मोठीच्या मोठी पडवी कोपऱ्यात असणारा टेबल आणि दूरदर्शनला डिस्कव्हरी चॅनेल ला पाहिलेले ते जंगलातील काही प्राणी, तसेच अंगणात हिरवे पट्टे असणारी ती टीव्हीएस स्कूटर, घराच्या कोपऱ्यात असलेला तो नळ आणि त्या नळाच्या पाण्यावर फुलणारी ती चमेली आणि अबोली तिथेच अंगणात शेजारी असणारा सरांचा ओटा आणि मामांच्या घराजवळील अंगणातल्या लाकडी छप्पारात असलेली ती कॉट आणि त्यावर दाजी, वाहिनी आणि आम्ही खेळणारी भावंडे, जे ते आपापल्या मार्गानी मार्गस्थ झालेले चमेलीच्या फुलांचा वहिनींनी शिकवलेला गजरा त्याचा तो हाताला येणारा सुगंध आजही आठवणीत हरवतो.आणि डोळे ओले करून टाकतो.

मागच्या दाराला वाट पाहणारे ते डोळे.. त्या आसुसलेल्या डोळ्यातला तो भाव ते वात्सल्य आज कुठल्याशा परिवर्तनात हरवून गेले आहे असे वाटत राहते. कौलारू घरांमधून घुसणारा तो धूर आज औद्योगिकीकरणाच्या आड धूसर झाला. एकाच अंगणात नांदणारी प्रेम, माया, ममता विचारांच्या शृंखलेत तोकडी झाली.

डिजिटलच्या जमान्यात जग जवळ आले पण नाती दुरावत गेली. यावरून एकच म्हणावेसे वाटते.

पूर्वीच्या काळी नाती होती जणू लेकुरवाळी,
डिजिटलाच्या युगात जग आले जवळी,
पण कुटुंबव्यवस्था झाली कोवळी कोवळी.
प्रेम, माया, ममतेची अळीमिळी गुपचिळी,
जो तो स्वतःच्या जीवनात व्यस्त जगण्याची त्याच्या परिभाषाच झाली निराळी.

# मोहितेमळा शाळेचा रक्षाबंधन निमित्त विशेष उपक्रम



**ज्ञान सेतू ब्युरो**

मोहितेमळा शाळेत विविध उपक्रम आयोजित केले जातात. त्यामध्ये रक्षाबंधन निमित्त आयोजित केलेला राख्या तयार करणे हा एक आगळावेगळा उपक्रम होता. कारण इयत्ता पहिली ते चौथी मध्ये शिकणाऱ्या बालचमुनी स्वतः राख्या बनवल्या आणि तयार केलेल्या राख्या देश सेवा करणाऱ्या वीर जवानांसाठी पाठवण्यात आल्या.

त्याचबरोबर बालसुधारगृहातील मुलांसाठीही राख्या पाठवण्यात आल्या. यामधून त्यांच्यामध्ये कला, कार्यानुभव हस्तकला याबरोबर आपण माणूस म्हणून कसं जगावं याचाही धडा मिळणार आहे. देशभक्ती आणि संवेदनशीलता जागी होणार आहे.त्यांच्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.



# शिक्षण आणि कायदा

*विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा अधिकार : संविधानातील कलम 21A पासून RTE पर्यंत!*

अॅड. शोमितकुमार व्हि. साळुंके (LLM, M.Phil. Law University of Mumbai )
तथा विधीज्ञ, उच्च न्यायालय खंडपीठ छ. संभाजीनगर.
ऑफिस: १०३ विंग क्रमांक अ, राजसारथी अपार्टमेंट कॅनॉट परिसर सिडको छ. संभाजीनगर.(औरंगाबाद)

## विद्यार्थी न्यायालयात गेला तर काय होते?

पुढे......

Article 226 : विद्यार्थ्याच्या हातातील घटनात्मक दार

भारतीय संविधानाचे Article 226 हे उच्च न्यायालयाच्या writ jurisdictionचे मूळ अधिष्ठान आहे.

या तरतुदीनुसार प्रत्येक उच्च न्यायालयाला आपल्या अधिकारक्षेत्रात कोणत्याही व्यक्ती किंवा प्राधिकरणाला directions, orders किंवा writs जारी करण्याचा अधिकार आहे. त्यात habeas corpus, mandamus, prohibition, quo warranto आणि certiorari यांसारख्या writsचा समावेश होतो. हे अधिकार केवळ Fundamental Rightsच्या अंमलबजावणीपुरते मर्यादित नाहीत; Article 226 अंतर्गत “for any other purpose” देखील न्यायालयीन हस्तक्षेप शक्य आहे.

ही शेवटची बाब अत्यंत महत्त्वाची आहे. Article 32 अंतर्गत सर्वोच्च न्यायालयाचा अधिकार मुख्यतः Fundamental Rightsच्या enforcementशी संबंधित आहे. परंतु Article 226 अंतर्गत उच्च न्यायालयाचा अधिकार अधिक व्यापक आहे. एखाद्या विद्यार्थ्याचा प्रश्न मूलभूत अधिकाराशी संबंधित असू शकतो, परंतु तो एखाद्या वैधानिक अधिकाराशी, विद्यापीठाच्या कायद्याशी, शासनाच्या नियमाशी, प्रशासकीय आदेशाशी किंवा सार्वजनिक कर्तव्याशी संबंधित असू शकतो. म्हणूनच एखाद्या विद्यार्थ्याला न्यायालयात जाण्यासाठी प्रत्येक वेळी Article 21 किंवा Article 14चा थेट भंग सिद्ध करणे आवश्यक नसते.

उदाहरणार्थ, विद्यापीठाच्या नियमांनुसार विद्यार्थी परीक्षेला पात्र असूनही विद्यापीठाने त्याचा examination form स्वीकारला नाही, तर हा प्रश्न केवळ “माझा Fundamental Right भंगला” असा नसून “विद्यापीठाने स्वतःच्या वैधानिक नियमांनुसार कर्तव्य पार पाडले का?” असाही असू शकतो. याच ठिकाणी Article 226ची व्यापकता दिसून येते.

Writ म्हणजे नेमके काय?

सामान्य भाषेत सांगायचे तर writ म्हणजे उच्च न्यायालयाकडून दिलेला असा घटनात्मक आदेश किंवा निर्देश, ज्याद्वारे एखाद्या सार्वजनिक प्राधिकरणाला कायद्यानुसार कार्य करण्यास सांगितले जाऊ शकते, (क्रमशः)

हे पत्रक **संपादक – दिनेश गायके** यांनी कार्यालय **आर–४३, टी–१०, साईपार्क, म्हाडा कॉलनी, एन–७, सिडको, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)** येथून प्रकाशित केले.
मो.8275097161 Email -dnyansetuepaper@gmail.com